# महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ

## शुल्क निर्धारण समितीच्या पहिल्या सभेचे इतिवृत्त

शुल्क निर्धारण समिती पहिली सभा शनिवार दिनांक २४ /०९ /२०२२ रोजी दुपारी ३.०० वा. ऑन लाइन व्हिडियो कॉन्फरन्स टेक्नॉलॉजी वापरुन आयोजित करण्यात आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे सदस्य उपस्थित होते.

१. डॉ. शशिकला वंजारी, माजी कुलगुरू, एस एन डी टी विद्यापीठ – समिती अध्यक्ष
२. श्रीमती प्रेरणा देवधरे, कायदा विशेषज्ञ – सदस्य
३. सीए तपन आपटे, सनदी लेखापाल – सदस्य
४. सीए राजेश पाटील, सनदी लेखापाल – सदस्य
५. श्री विक्रमसिंह यादव, मुख्य वित्त व लेखा अधिकारी
महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ – सदस्य सचिव

या सभेत उपस्थित असलेल्या सर्व सदस्यांचे स्वागत श्री विक्रमसिंह यादव, मुख्य वित्त व लेखा अधिकारी आणि सदस्य सचिव शुल्क निर्धारण समिती यांनी केले. शुल्क निर्धारण समिती सभेत खाली निर्देशित एका प्रस्तावास मा शुल्क निर्धारण समितीने मान्यता दिलेली आहे.

प्रस्ताव क्र १ (अ क्र ०१ /२४०९२२)

अभियांत्रिकी व तंत्रज्ञान विभागातील प्रमाणपत्र आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या शुल्क रचनेबाबत.

टीप: महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ अधिनियम २०२१ कलम ५७ (१) मध्ये विहित केलेल्या तरतुदीनुसार विद्यापीठाने मा. डॉ शशिकला वंजारी, माजी कुलगुरू, एस एन डी टी विद्यापीठ यांच्या अध्यक्षतेखाली फी निर्धारण समितीचे गठन केले आहे. शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये सुरू करावयाच्या अभियांत्रिकी अभ्यासक्रमांच्या प्रमाणपत्र आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या शुल्क रचनेबाबत प्रस्ताव मा शुल्क निर्धारण समितीसमोर सादर करण्यात आला आहे.

सबब महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाकडून शुल्क रचना लागू करणेसाठी प्रस्ताव मा शुल्क निर्धारण समितीसमोर विचारार्थ सादर.

| अ क्र | अभ्यासक्रम | विद्यार्थ्याने पूर्ण करावयाचे क्रेडिट्स | प्रति क्रेडिट प्रस्तावित शुल्क | एकूण अभ्यासक्रम प्रस्तावित शुल्क | अभ्यासक्रम कालावधी | प्रस्तावित वार्षिक शुल्क |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | अभियांत्रिकी व तंत्रज्ञान विभागातील प्रमाणपत्र | २४ | रु २२००/- | रु ५२,८००/- | ६ महिने | रु ५२,८००/- |
| २ | अभियांत्रिकी व तंत्रज्ञान विभागातील पदव्युत्तर पदवी MTech | ११४ | रु १८६० /- | रु २,१२,०००/ | ०२ वर्षे | रु १,०६ ,०००/- |

ठराव:

असा ठराव करण्यात येतो की अभियांत्रिकी व तंत्रज्ञान विभागाने प्रस्तावित केलेल्या अभियांत्रिकी अभ्यासक्रमांच्या प्रमाणपत्र आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या शुल्क रचनेस मान्यता देण्यात येत आहे.

सदस्य सचिव
फी निर्धारण समिती

मा अध्यक्ष
फी निर्धारण समिती